# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**संपर्क क्रमांक 0217-2744770ए ईमेल** est.section@sus.ac.in



**वाचा:** महाराष्ट्र शासन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ९०/व्यशि-३, दि. ०९/०७/२०२७.

## सूचना

राज्यातील अनेक उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध असलीतरी असे उद्योग व बेरोजगार युवक यांना साधणारा दुव्यांचा अभाव असल्याकारणाने युवकांना शिक्षणानंतर अनुभवाअभावी पूर्णवेळ रोजगार मिळणे कठीण होत असल्याचे निदर्शनास आल्याने राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून नोकरी मिळण्याची क्षमता (Employability) वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने संदर्भिय शासन निर्णयान्वये महाराष्ट्रामध्ये **"मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना"** राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या अनुषंगाने उक्त शासन निर्णयामध्ये नमूद तरतुदीला अनुसरुन प्रस्तुत विद्यापीठामध्ये ११ उमेदवारांची निवड करावयाची आहे.

तरी उक्त शासन निर्णयामध्ये नमूद तरतुदी/नियम व अटींना अनुसरुन मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरीता वय वर्ष १८ ते ३५ मधील इच्छुक उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे, महाराष्ट्रातील अधिवास विषयक प्रमाणपत्र, आधार कार्ड, बँक खात्याचे तपाशिल व कौशल्य रोजगार, उद्योजकता आयुक्तालयाकडील नोंदणी क्रमांकासह दि.१०/०९/२०२४ रोजी. स.११.३० ते दु. ०१.३० पर्यंत विद्यापीठ सभागृह, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, केगाव, सोलापूर ४१३ २५५ येथे उपस्थित राहावे. सदर वेळेनंतर येणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**(योगिनी घारे)**
कुलसचिव

संदर्भ क्रमांक: पुअहोसोविसो/आस्था/२०२४/२३१
दिनांक:०५/०९/२०२४